NAAC Accreditied-२०१५
B Grade (CGPA २.६२)

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
## परिपत्रक

**विषय :- सहाय्यक प्राध्यापकांचे स्टेज - १ ते २ (एजीपी ६००० ते ७०००) स्टेज- २ ते ३ (एजीपी ७००० ते ८०००) मध्ये स्थाननिश्चितीबाबत**

सर्व प्राचार्य / संचालक, संलग्तिन अनुदानित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांना आदेशान्वये या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील नव्याने स्टेज - १ ते २ आणि स्टेज - २ ते ३ मध्ये स्थाननिश्चिती करिता विद्यापीठ परिपत्रक जा. क्र. सोविसो/मविविमं/युजीसी/२०१५-१६/४१०८ दि. २८/०४/२०१६ अन्वये कळविण्यात आले होते.

विद्यापीठ अनुदान आयोग अधिसूचना दि. ३० जून, २०१० मधील तरतूद ६.३.५.२ नुसार सहाय्यक प्राध्यापकांचे CAS अंतर्गत स्टेज - १ ते २ आणि स्टेज - २ ते ३ मध्ये महाविद्यालय स्तरावर स्थाननिश्चिती करते वेळी काही महाविद्यालयात शिक्षकांच्या मुलाखती घेतल्या जात असल्याचे विद्यापीठाच्या निदर्शनास येत असल्याने, सर्व महाविद्यालयातील मा. प्राचार्यांना सूचित करण्यात येते की, पात्र शिक्षकांच्या स्थाननिश्चितीच्या बैठकीत Screening Cum Evaluation Committee ने शिक्षकांचे कागदपत्रे तपासून निर्णय घेणे अपेक्षित आहे. समितीतील सदस्यांना पात्र शिक्षकांच्या कागदपत्रांमध्ये काही त्रुटी वाटल्यास सदर कागदपत्रांची मागणी प्राचार्यांकडे करावी व संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य यांनी, संबंधित शिक्षकांकडून कागदपत्रे उपलब्ध करुन घेवून समितीस पुरवावीत. या प्रमाणे स्थाननिश्चिती बाबतची कार्यवाही करावी. जेणेकरुन पात्र शिक्षकांना पात्र दिनांकापासून CAS अंतर्गतचे लाभ देय राहतील.

जा.क्र. सोविसो/मविविमं/युजीसी/२०१६-१७/8947
दिनांक: 21 SEP 2016

**[प्राचार्य आर. वाय. पाटील]**
**संचालक,**
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

प्रति,
**मा. प्राचार्य / संस्थाचालक,**
सर्व संलग्नित अनुदानित महाविद्यालय व मान्यता प्राप्त शिक्षण संस्था